**प्रेसनोट** **दि.०५/०६/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## मुस्लीम बांधवांना गुलाब पुष्प देवुन त्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

"मानवता हेच सर्व धर्माचे सार असुन सामाजिक एकोपा वृध्दींगत होणे साठी" आज बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत रमजान ईद निमित्त पोलीस ठाणे हद्दीतील हजरत बिलाल अंजूमन, मोहम्मदिया अंजुमन, खाजा गरिबनवाज अंजुमन, तैयब्बा मशिद, हजरत उस्मानिगणी अंजुमन, मदरशा ए दारुले उलम या ठिकाणी प्रथम नमाज पठण करण्यात आले. नमाज पठणा नंतर मुस्लीम बांधवांना बिबवेवाडी पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचेसह पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी वर्गांनी मुस्लीम बांधवासोबत गळे भेट घेवुन व गुलाब पुष्प देवुन त्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

सदर कार्याक्रमास बिबवेवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे, महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती जाधव,निंबाळकर, पोलीस उप निरीक्षक श्री वाघमारे, थोरात, लिटे तसेच पोलीस हवालदार पुणेकर, तणपुरे, पोलीस शिपाई पवार,देवकाते, दाभेकर,पाटोळे,महिला पोलीस शिपाई चव्हाण असे हजर होते.





